कायम विना अनुदान
इ-८ वी सह ९ वी/ १० वी च्या वर्गास जून -२००९ पासून परवानगी

जा.क्र.माध्य. /३/१२/१/नमाशा /पुवि /२००९-१०
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय
दिनांक : 31 OCT 2009

२६३६५/६६ (7)

सचिव,
दि. पुना गुजराथी केळवणी मंडळ, कसबा पेठ,
पुणे

**विषय** :- सन २००९-१० या शैक्षणिक वर्षात कायम विनाअनुदान तत्वावर नविन माध्यमिक शाळांना परवानगी देणेबाबत..

**संदर्भ** :- १) शासन निर्णय क्र. नमाशा-२००९/(१५३/२००९)/माशि-१, दि. २७ जुलै, २००९
२) या कार्यालयाचे जा.क्र. माध्य. ३/१२/नमाशा /पुवि/ २००९-१० दिनांक २५/ ८/२००९
३) शिक्षणाधिकारी (माध्य.) जि. प. यांचे पत्र क्र. जिप/माध्य-८/नमाशा/पट/२३४/०९
दिनांक ३/१०/२००९

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घेतलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून खालील दर्शविलेल्या ठिकाणी इ. व माध्यमातून जून २००९ पासून कायम विनाअनुदान तत्वावर विशेष बाब म्हणून नवीन माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे. [इ. ८ वी व ९ वीच्या वर्गास]

| अ.क्र. | शैक्षणिक संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| | दि. पुना गुजराथी केळवणी मंडळ, कसबा पेठ, पुणे | दि. पुना गुजराथी केळवणी मंडळाची इंग्रजी माध्यमाची माध्यमिक शाळा | आठवी, नववी व [illegible] | इंग्रजी |

**कायम विना अनुदान**

१) आपल्या संस्थेस वर नमूद केलेल्या ठिकाणी नविन माध्यमिक शाळेस इंग्रजी माध्यमासाठी कायम विनाअनुदान तत्वावरच मंजूरी देण्यात आली असून भविष्यात कधीही अनुदान, तसेच कोणत्याही प्रकारची आर्थिक मदत देण्यात येणार नाही.

२) शासनाच्या पूर्व परवानगीने निश्चित केलेले शिक्षण शुल्क विद्यार्थ्यांकडून आकारणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३) "कायम विनाअनुदान तत्वावर मिळालेली शाळा" असा फलक ठळक अक्षरात शाळेच्या दर्शनी भागात पालकांना दिसेल अशा तऱ्हेने लावणे हे आपल्या संस्थेवर बंधनकारक आहे.

४) सदर कायम विनाअनुदानित मान्यता मिळालेल्या संस्थेने / शाळेने संबंधित अधिकाऱ्यांशी / शासनाशी पत्रव्यवहार करतांना "कायम विनाअनुदानित शाळा" अशा प्रकारचे लेटरहेड वापरणे आवश्यक आहे.

५) सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे उदा. विद्यार्थ्यांचे फीबाबत तसेच माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

७) इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी (ई.बी.सी.) फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

८) शाळा बंद करण्यात आलेल्या तुकड्यातून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येऊ नये.

९) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (प्रोहिबिशन ऑफ कॅपीटेशन फीज) कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी / वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येऊ नये.

१०) माध्यमिक शाळा संहिता व खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

११) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र.-एसएसएन २१०३/(५०/०३)/माशि-२, दि. २७ मे, २००३ मधील अटी व शर्ती, कार्यपध्दती संस्थेवर बंधनकारक राहतील.

१२) संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदु रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्ती करण्यात येईल.

१३) शिक्षक / कर्मचारी संच शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून मंजूर करून देण्यात येईल.

१४) माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

१५) शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधांसह ठेवण्यात येतील.

१६) माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये कार्यबळ गट समिती सभेच्या पूर्व परवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

१७) माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ३.२ (१७) अन्वये शाळेत पालक-शिक्षक संघाची स्थापना सहा महिन्याच्या आत करणे आवश्यक आहे.

१८] जनहितार्थ याचिका क्र. ४८३/०४ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १४ एप्रिल ०९ रोजी "शाळांमध्ये अग्निसुरक्षा राबविणे" या संदर्भातील दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे संस्थेवर बंधनकारक राहील. [कृ. मा. प]

PRINCIPAL
Dr. G.G. Shah Eng. Med. High School
1433, Kasba Peth, Pune-411011

PRINCIPAL
Dr. G.G. Shah Eng. Med. High School
1433, Kasba Peth, Pune-411011.

इतर बाबी :-

१) संबंधित संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२) संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३) सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखादी शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४) संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५) सदर संस्थामार्फत शाळा सुरु करण्यासाठी सादर केलेल्या प्रस्तावाच्या संदर्भात कोणत्याही न्यायालयात दावा चालू नाही.

वरील बाबींपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरुध्दात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात यावे.

आपल्या शाळेला घ्यावयाची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ अनुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यता करिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पद्धती मधील नियम १ ते १५ मधील विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थळ प्रत मा. शिउसं यांनी मान्य केली आहे.

(बाळासाहेब ओव्हाळ)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१. करिता

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी

१) शिक्षणाधिकारी (माध्य.) जिल्हा परिषद, पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांना वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देऊन पत्रात नमूद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयास प्राप्त झाले असल्यास त्याविषयी सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांमार्फत तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२) मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

३) मा. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.

४) निवड नस्ती

PRINCIPAL
Dr. G.G. Shah Eng. Med. High School
1433, Kasba Peth, Pune-411011.